# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १३ जून, २०२२

---

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने जिल्हा सामान्य रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव आणि इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठी कोविड लसीकरण वर्धक मात्रा (बूस्टर डोस) शिबीराचे आयोजन सोमवार दि.१३ जून रोजी विद्यापीठात करण्यात आले. या वेळी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा. के. एफ.पवार, उपकुलसचिव ए.सी.मनोरे, आरोग्य सेवक योगेश सपकाळे उपस्थित होते. या शिबीरात श्रध्दा सपकाळे, सुजाता सुरवाडे यांनी लसीकरणाचे काम केले. यावेळी २३० कर्मचाऱ्यांना वर्धक मात्राचे लसीकरण करण्यात आले. या शिबीरास डॉ.उज्वला वर्मा, डॉ.राकेश सुरळकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रभारी अधिष्ठाता प्रमोद पवार, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल यांनी भेट दिली. सुत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी डॉ.सोमनाथ वडनेरे, शैलेश पाटील, बाळासाहेब पाटील, बलभिम गिरी, मयुर पाटील, एस.बी. पाटील, अरुण सपकाळे, शुभम सोनवणे, संदेश तायडे, संजय पाटील, भरत चौधरी आदींनी परिश्रम घेतले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करिता